**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २५०** **दिनांक :- ०९/०९/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०२ पिडित मुलींची सुटका.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना गोपनीय माहितगाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, रु.नं.२०३, बिल्डीग नं.३०, चंद्रेश ॲकॉर्ड, को.ऑ.हौ.सोसायटी, सिल्व्हर पार्क, मिरारोड पूर्व या ठिकाणी महिला वेश्यादलाल हिना खान व तिची साथीदार रिना अशा दोघी मिळुन पुरुष गिऱ्हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात त्यांचे रहाते घरी मुली पुरवितात अशी खात्रीशीर बातमी मिळाली. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांनी पोलीस पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन १६.३० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल हिना मोहम्मद युसुफ खान, वय-४० वर्ष, व तिची साथीदार रिना बरोशि छारी, वय-२६ वर्ष हया पुरुष गिऱ्हाईकाकडुन वेश्यागमनाच्या मोबद्दल्यात पैसे स्वीकारुन मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिची साथीदार यांना अटक करुन त्यांचेविरुध्द पो.हवा./१९८७ विजय विनायक ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३०८/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे वपोनि. श्री. संपतराव पाटील, मसपोनि. तेजश्री शिंदे- भरोसा सेल, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा./१९८७ विजय ढेमरे, पो.हवा./२२९८ विजय निलंगे, पो.हवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.शि./३६६० केशव शिंदे, मपोना/१७८९ यंबर, मपोना/२८४५ कमल चव्हाण, चा.पोना/२६३८ सम्राट गावडे यांनी केली आहे.